# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा.क्र./उमपा/करवि/यु ३/१९८/२३ दिनांक 2/2/२०२४

**प्रस्तावना**

विषय :—उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन **श्री संजय रामचंद पेसवानी** यांचे नांवे मालमत्ता क्र.19BI016058900अन्वये करण्यात आलेली नांवाची नोंद रदद् करुन पुर्ववत **हरीराम शिवनदास** यांचे नांवे करणेबाबत.

संदर्भ :— श्री कमल परसराम धामेजा यांचा दि.१६/१२/२०२३ रोजीचा अर्ज.

अर्जदार श्री कमल परसराम धामेजा राहणार शॉप नं.७१९,सेवकराम आहुजा चौक,आवत चौक,खेमाणी, उल्हासनगर —२ यांनी **लोकशाही दिन अंतर्गत** दिनांक १६/१२/२०२३ रोजी मालमत्ता क. 19BI016058900 (१९/०००७) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन **श्री संजय रामचंद पेसवानी** अशी नावाची नोंदीबाबत हरकत दाखल केली आहे.

सदर आक्षेपाच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका संगणकीय नोंदीनुसार तपासणी केली असता कर आकारणी पुस्तकात आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र 19BI016058900 (१९/०००७) करीता मालमत्ता कर देण्यास जबाबदार व्यक्ती म्हणुन **हरीराम शिवनदास** अशी नोंद होती.

तद्नंतर श्री. सिंजय रामचंद पेसवानी यांनी नांव हस्तांतरण करणेसाठी दि. ०९/१०/२०२३ रोजी अर्ज कर विभागात दाखल केला. सदर अर्जाच्या अनुशंगाने उक्त मिळकतीवर पत्र जा.क्र./उमपा/करवि/यु.३/३३६/२३ दि.०३/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणून **श्री. संजय रामचंद पेसवानी** अशी नोंद करण्यात आली असुन नोंद करतेसमयी खालीलप्रमाणे कागदपत्र जोडले आहेत.

१. महापालिकेकडील विहित नमुन्यातील अर्ज
२ कर भरणा ना देयक प्रमाणपत्र वर्ष २०२३ — २४ करीता
३. दानोमल शिवनदास धामेजा व रुक्मणी हरीराम धामेजा यांचे दरम्यान कन्व्हेन्सडीड रजि. नं. ४६२२ दि. ११/१०/१९९५ ची छायांकीत प्रत
४. रुक्मणी हरीराम धामेजा व पुरषोत्तम मोतीराम बहरानी यांचे दरम्यान कन्व्हेन्सडीड रजि. नं. ४८५६ दि. २६/११/१९९६ ची छायांकीत प्रत
५. पुरषोत्तम मोतीराम बहरानी व रामशरया आर.गुप्ता/रामविलास रामुगराह गुप्ता यांचे दरम्यान कन्व्हेन्सडीड रजि. नं. ५०१ दि. ११/०२/१९९८ ची छायांकीत प्रत
६. रामशरया आर.गुप्ता/रामविलास रामुगराह गुप्ता व रामचंद भगवानदास पेसवानी यांचे दरम्यान खरेदीखत नोटरी नं. १७४ दि. २९/०८/२००३ ची छायांकीत प्रत
७. रामचंद भगवानदास पेसवानी यांचे मृत्युप्रमाणपत्राची दि. २१/०५/२०१४ ची छायांकीत प्रत
८. कौशल्या रामचंद पेसवानी यांचे मृत्युप्रमाणपत्राची दि. ०३/०३/२०१२ ची छायांकीत प्रत
९. कन्हैयालाल रामचंद पेसवनी/सुरेशलाल रामचंद पेसवानी/राजु रामचंद पेसवानी/दिपक रामचंद पेसवानी व श्री. संजय रामचंद पेसवानी यांचे दरम्यान रिलीजडीड नोटरी नं. १९८६ दि. ०१/१०/२०२३ ची छायांकीत प्रत
१०. इन्डीमीन्टी बॉन्ड व ताबा पावती नोटरी नं. १९८७ दि. ०१/१०/२०२३
११. डेली टाउन दर्शन वर्तमानपत्र दि. ०८/१०/२०२३
१२. प्रतिज्ञापत्र. इत्यादी सादर केलेल्या कागदपत्रानुसार नांव हस्तांतरण करण्यात आले.

उक्त मालमत्तेसंबंधी विषयांकित प्रकरणी संबंधित विभागाचे कर निरीक्षक यांनी संदर्भित मिळकतींची प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली. त्यानुसार कर निरिक्षकांनी प्रत्यक्ष पाहणी अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे. उक्त मालमत्तेसंबंधी विषयांकित प्रकरणी संबंधित विभागाचे कर निरीक्षक यांनी संदर्भित मिळकतींची प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली. त्यानुसार कर निरिक्षकांनी प्रत्यक्ष पाहणी अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

सदर अर्जदाराने उक्त मिळकतीचे मालमत्ता पत्रक,नागरी भुपामन,उमपा करपावती वर्ष २०२३—२४ ची कर भरणा केल्याचे प्रमाणपत्र,,उपविभागीय अधिकारी यांचे कडील दि. २२/११/२०२२ रोजीचे पत्र,व दि. २५/०१/२०२३ रोजीची सनद, नगर भुमापन मोजणी दि.२१/०४/२०२२ रोजीचे पत्र, इत्यादी कागदपत्र सादर केले आहे. त्यानुसार सदरचे श्री. संजय रामचंद पेसवानी नावाची नोंद रदद् करण्यात यावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत कोणत्याही व्यक्तीचे नावाची नोंद कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात येते याचा मालकी हक्काशी संबंध नाही.

त्यामुळे सदरचे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्र 19BI016058900 (१९/०००७) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली **श्री. संजय रामचंद पेसवानी हि नोंद रदद्** करुन प्रथम कर आकारणीनुसार **हरीराम शिवनदास** हि नोंद पुर्ववत कायम ठेवणे योग्य वाटते. तसेच जर आपणाकडे उक्त मालमत्तेचे ठोस पुरावा असल्यास सादर करावा.

यास्तव विषयांकित प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत आकारणी पात्र मालमत्ता क्र.19BI016058900 (१९/०००७) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली **श्री. संजय रामचंद पेसवानी** हि नोंद रदद् करुन वर्ष २०२३–२४ प्रथम कर आकारणीनुसार **हरीराम शिवनदास** हि नोंद पुर्ववतकरावी.

२. तसेच जर आपणाकडे उक्त मालमत्तेचे ठोस पुरावा असल्यास सादर करावा.

**ह.**

(जेठानंद करमचंदानी)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

**प्रति,**

१) मे. कोल्ब्रो ग्रुप,नागपुर योग्य त्या कार्यवाहीसाठी.
२) श्री कमल परसराम धामेजा राहणार शॉप नं.७१९,सेवकराम आहुजा चौक,आवत चौक,खेमाणी,उल्हासनगर –२
३) श्री. संजय रामचंद पेसवानी